# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली दिनांक ०१/०५/२०१७

## पोलीस-नक्षल चकमकीत हत्यारासह नक्षल साहित्य जप्त

काल दिनांक ३०/०४/२०१७ रोजी उपविभाग भामरागड अंतर्गत येणाऱ्या पोमके नारगुंडा हद्दीत नारगुंडा पोस्ट पोर्टी व सी.आर.पी.एफ. संयुक्तपणे रोड ओपनिंग करीत असतांना सकाळी १०.०० वा. च्या दरम्यान पोलीस-नक्षल चकमक झाली. पोलीसांनी आत्मसंरक्षणार्थ प्रत्युत्तरादाखल नक्षल्यांच्या दिशेने गोळीबार केला. पोलीसांचा वाढता दबाव पाहून नक्षलवादी आपल्या जवळील हत्यार व साहित्य घटनास्थळीच टाकून जंगलाचा फायदा घेवून पळून गेले.

दरम्यान चकमकीनंतर घटनास्थळाचा शोध घेतला असता पोलीसांनी घटनास्थळावरुन १ भरमार रायफल, १ लोखंडी रॉड , १ चाकू असे नक्षल साहीत्य जप्त केले आहे.

नक्षलवादयांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच सदर जंगल परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले आहे.

